भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४८७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०७/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी .:—**

दिनांक ०१/०७/२०१७ चे १६.४५ वा. दर. यातील फिर्यादी हेमराज यशवंत कोरे वय ३६ वर्ष रा. पळसगाव यांची स्व:ताची मोटार सायकल क्र. एमएच ३६ /एम ५०६६ काळया हिरव्या रंगाची बजाज डिस्कव्हर ही कापगते पेट्रोल पंप साकोली येथे ठेवुन स्व:ताचे उपचार करण्यासाठी भंडारा येथे गेले असता उपचार करून साकोलीला परत आल्यावर कापगते पेट्रोल पंप साकोली येथे फिर्यादीची मोटार सायकल दिसुन आली नाही, शोध घेतले असता मिळुन आली नाही कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीची मोटार सायकल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटुण झाडावर आदडुन खाली पडुन डोक्याला गंभिर मार लागुन स्वतःच्या मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक ०२/०७/२०१७ चे १७.३० वा. दर. यातील मृतक आरोपी त्याच्या ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालुवन रेंगेपार टर्निंग रोडवर त्याचे मोटार सायकलवरील नियंत्रण सुटल्याने मोटार सायकल हि सागवनाच्या झाडावर आदडल्याने मोटार सायकल सह खाली पडुन डोक्याला मार लागुन गंभिर जखमी होवुन स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी धनराज वासुदेव वरखडे वय ३६ वर्ष रा. मुरदोली ता. गोरेगाव जि. गोंदिया यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४ (अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी रेवतकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) संगनमत करून दगडाने डोक्यावर ,चेहऱ्यावर,छातीवर बुक्याने मारपीठ केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०२/०७/२०१७ चे ०१.३० वा. दर. यातील फिर्यादी नरेश सिताराम पिथोडे वय ४८ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड गणेशपुर हे आदेश्वर सुझुकी शोरूम मध्ये सिक्युरीटी गार्ड म्हणुन डयुटीवर हजर असता अनोळखी दोन इसम आरोपी यांनी फिर्यादीला 'तु घर जाके सोजा' असे म्हणुन फिर्यादी याने मी आपली डयुटी करीत आहे तुम्ही आपले घरी जा असे बोलला असता यातील अनोळखी आरोपीतांनी भांडण, संगनमत करून फिर्यादीला दगडाने डोक्यावर मारून जखमी करून चेहऱ्यावर छातीवर बुक्याने मारपिठ केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा चोपकर पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) सार्वजनिक ठिकाणी दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०७/२०१७ चे १५.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल दारू पिऊन दारूचे नशेत कलेक्टर चौक भंडारा येथे मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहल अॅनालायझर मशिन द्वारे चेक केले असता अल्कोहलचे प्रमाण मिहुन आल्याल्याने व डॉक्टर परिक्षण रिपोर्ट वरून पोस्टे भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गजभिये पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैध दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक ०२/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २५ लिटर हातभट्टी दारु किंमती २,५००/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०२/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२ ,तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एम.एम. सिडाम)
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.